सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९० | गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





श्री. पुषंद ढाके (खिलू भाऊ)
अमळनेर



श्री. सतिष पाटील
अमळनेर

## दिनविशेष

०२ एप्रिल

- बालचित्र पुस्तक दिन
- 'गणेश वासुदेव जोशी' यांच्या प्रेरणेने पुणे सार्वजनिक सभेची ( पब्लिक असेंब्लीची) स्थापना झाली.
- छत्रपती राजार्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला.
- भारताने २८ वर्षांनी क्रिकेट विश्वचषक जिंकला

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# भारतीय टपाल सेवेचा अमळनेरला बोजवारा

## नवीन पोस्ट ऑफिस उघडा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराची वाढलेली लोकसंख्या, वाढलेली हद्द आणि दररोज होणारे लाखो रुपयांचे व्यवहार पाहता शहरात आणखी तीन ते चार पोस्ट ऑफिसची नितांत गरज आहे. मात्र, नवीन कार्यालये सुरू करण्याऐवजी प्रशासनाने सुरू असलेली कार्यालये बंद केल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर पैलाड भागात स्वतंत्र पोस्ट ऑफिस सुरू करावे आणि मुख्य डाकघरात तत्काळ अतिरिक्त काऊंटर सुरू करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते धनंजय सोनार यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी औरंगाबाद विभागीय कार्यालय, जळगाव डाक अधीक्षक आणि अमळनेर पोस्ट मास्तर यांना निवेदन दिले असून, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.



निवेदनात म्हटले आहे, की पाचोरा आणि चाळीसगाव सारख्या तालुक्यांच्या ठिकाणी चार-चार पोस्ट ऑफिस कार्यरत आहेत. मात्र, अमळनेरमध्ये वाडी चौक आणि प्रतापनगर येथील पोस्ट ऑफिस अकारण बंद करण्यात आली आहेत. यामुळे संपूर्ण शहराचा भार एकमेव मुख्य पोस्ट ऑफिसवर येऊन पडला आहे. तासन् तास रांगेत उभे राहिल्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि व्यापाऱ्यांची मोठी 'पंचायत' होत आहे.

शहरातील पैलाड भाग हा विस्तारलेला असून, या ठिकाणी जगप्रसिद्ध श्री मंगळग्रह मंदिर यांसह अनेक मोठे व्यावसायिक व उद्योजक आहेत. पोस्टाने सुलभ पार्सल आणि कुरिअर सेवा सुरू केल्याने येथून दररोज शेकडो पार्सल पाठविले जातात. या सर्वांना शहराच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या मुख्य पोस्ट ऑफिसमध्ये जावे लागते. त्यामुळे पैलाड, आर. के. नगर, गळवाडे रोड आणि वाडी चौक परिसरात नवीन पोस्ट ऑफिस होणे गरजेचे आहे.

दोन काऊंटर तत्काळ सुरू करण्याची मागणी जोर धरत असून जोपर्यंत नवीन पोस्ट ऑफिस मंजूर होऊन कार्यान्वित होत नाहीत, तोपर्यंत मुख्य पोस्ट ऑफिसमधील कामाचा ताण कमी करण्यासाठी पार्सल आणि नोंदणीकृत टपाल स्वीकारण्यासाठी किमान दोन अतिरिक्त काऊंटर तत्काळ सुरू करावेत, अशी आग्रही मागणी धनंजय सोनार यांनी केली आहे. टपाल विभागाने याकडे दुर्लक्ष केल्यास जनतेच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## तयारी हनुमानजींच्या जन्मोत्सवाची...!




अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरातील श्री पंचमुखी हनुमानजी यांच्या मूर्तीवर जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सायंकाळी करण्यात आलेली आकर्षक सजावट. (छायाचित्र : नितेश बारी)

# उधना-सुभेदारगंज विशेष रेल्वेगाडीला जुलैपर्यंत मुदतवाढ

## खानदेशातील प्रवाशांना प्रवासाची अतिरिक्त सुविधा उपलब्ध होणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वे प्रशासनाने उधना ते सुभेदारगंज ही विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा नुकताच निर्णय घेतला होता. या गाडीला मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे खानदेशातील प्रवाशांना प्रवासाची अतिरिक्त सुविधा उपलब्ध होणार आहे. गुजरातसह मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांतील अनेक महत्त्वाच्या स्थानकांवर या गाडीला थांबे देण्यात आले आहेत.

पश्चिम रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार ०४१५६ ही उधना-सुभेदारगंज विशेष गाडी १० ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत उधना स्थानकावरून प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी दुपारी ४.१५ वाजता सुटणार होती आणि मार्गातील विविध स्थानकांवर थांबे घेत दुसऱ्या दिवशी रात्री ९ वाजता सुभेदारगंज येथे पोहोचणार होती. तसेच परतीच्या प्रवासासाठी ०४१५५ सुभेदारगंज-उधना ही विशेष गाडी ९ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत सुभेदारगंज स्थानकावरून प्रत्येक सोमवारी आणि गुरुवारी सकाळी ११.४० वाजता सुटणार होती आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १.१५ वाजता उधना येथे पोहोचणार होती. या विशेष रेल्वेगाडीच्या फेऱ्यांमुळे गुजरात ते उत्तर प्रदेश या मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन दोन्ही गाड्यांना आणखी काही महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय पश्चिम रेल्वे प्रशासनाने घेतला आहे.

### दोन्ही विशेष गाड्यांना अमळनेरला थांबा

दोन्ही विशेष गाड्यांना मार्गातील व्यारा, नंदुरबार, अमळनेर, धरणगाव, भुसावळ, इटारसी, राणी कमलापती, बिना, ललितपूर, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ओराई, पोखरण, गोविंदपुरी आणि फतेहपूर या स्थानकांवर दोन्ही दिशांनी थांबे देण्यात आले आहेत. यामुळे जळगाव जिल्ह्यातील प्रवाशांसाठी विशेषतः अमळनेर, धरणगाव व भुसावळ या स्थानकांवरील थांबे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.



### मुदतवाढीचे नियोजन पुढीलप्रमाणे

०४१५६ उधना-सुभेदारगंज विशेष गाडी १० ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत चालविण्यात येणार होती. या गाडीला आता १४ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याशिवाय ०४१५५ सुभेदारगंज-उधना विशेष गाडी ९ ते ३० मार्च २०२६ या कालावधीत चालविण्यात येणार होती. या गाडीला आता १३ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दरम्यान, ०४१५६ उधना-सुभेदारगंज विशेष गाडीसाठी मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ पासून आरक्षण सुविधा उपलब्ध झाली आहे. त्याचा लाभ घेण्याचे आवाहन पश्चिम रेल्वे प्रशासनाने केले आहे. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार या विशेष गाडीत एसी ३ टियर, स्लीपर क्लास तसेच सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे विविध श्रेणीतील प्रवाशांना त्यांच्या सोयीप्रमाणे प्रवास करता येणार आहे.

## सोन्याचा भाव आता गगनाला स्पर्श करणारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जवळपास गेल्या एक वर्षापासून सोने आणि चांदीचे भाव हे अस्थिर असल्याचे पाहायला मिळत आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांना खरेदी करण्यापूर्वी दहा वेळा विचार करावा लागत आहे. बुधवार, दि. १ एप्रिल रोजी १० ग्रॅम सोन्याचा भाव गगनाला स्पर्श करताना दिसून आला आहे.

आज जळगावातील सराफ बाजारात सोन्या आणि चांदीच्या भावात मोठी वाढ झाली आहे. सोन्याच्या भावात ३ हजार ५०० रुपयांची तर चांदीच्या भावात ६ हजार रुपयांची वाढ झाली आहे. १० ग्रॅम सोन्याचा भाव जीएसटीसह एक लाख ५३ हजार ९८५ रुपयांवर पोहोचले आहेत. तर चांदीचा भाव जीएसटीसह दोन लाख ५३ हजार ३८० रुपयांवर पोहोचला आहे.

### बनावट गुंठेवारी प्रकरण

# अतिक्रमण वाचविण्यासाठी केली बनावट कागदपत्रे

## बी फायनल अहवाल रद्द; न्यायालयाकडून पुन्हा गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बनावट गुंठेवारी करून अतिक्रमण वाचविण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केली व पालिकेने रस्ता मंजूर केला, या राजकुमार छाजेड विरुद्ध नगरसेवक मोहन सातपुते प्रकरणात अमळनेर न्यायालयाने पोलिसांचा बी फायनल अहवाल रद्द करीत पुन्हा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबतची माहिती अशी, की नगरसेवक मोहन सातपुते यांनी सिटी सर्व्हे ३२२३/ब/१ मधील प्लॉट नं. १८ चे बांधकाम करताना राजकुमार छाजेड यांच्या प्लॉट नं. २० मध्ये ५०० चौरस फूट अतिक्रमण केले. अतिक्रमण काढू नये म्हणून बनावट गुंठेवारी व कागदपत्रे तयार करून त्या ठिकाणी बेकायदेशीर रस्ता टाकण्याचा ठराव १३ मे २००३ रोजी करण्यात आला होता, असा आरोप करीत राजकुमार छाजेड यांनी २०१३ मध्ये अमळनेर पोलीस ठाण्यात संशयित आरोपी तत्कालीन प्रांतधिकारी निलेश सागर, तहसीलदार मायाताई सोनवणे, मुख्याधिकारी पी. जी. सोनवणे, पालिका अभियंता विजय शिंदे व सुदाम जगताप, मुख्य लिपीक सी. डी. महाजन, मंडळाधिकारी भावसार व शहर तलाठी, तत्कालीन नगराध्यक्ष सुरेश ललवाणी, नगरसेवक मोहन सातपुतेंसह दीपक भावसार, नामदेव पाटील, उषा धनगर, लालचंद सैनानी, योगेश सुहागीर, सुनंदाताई पाटील, संदीप घोरपडे, नरेंद्र संदानशिव, साहेबराव पारधी, सलीम टोपी, चंदूसिंग परदेशी, कैलास भावसार, रामदास शेलकर, पांडुरंग माळी, साहेबराव पवार, मंगलाताई भोसले, भारतीताई गाला, मुन्ना शर्मा, सुभाष अग्रवाल, सुशीलाताई चौधरी, मीनाताई चौधरी, रामदास निकुंभ, अली असगर बोहरी विष्णुदास सैनानी, वास्तुविशारद नंदकुमार भांडारकर आदींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यात २०१८ मध्ये तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांनी बी फायनल (गुन्हा रद्द) चा अहवाल तयार केला होता. मात्र हे प्रकरण न्यायालयात पाठविण्यात आले नव्हते. २०२३ मध्ये हा अहवाल न्यायालयात पाठविण्यात आला होता. या बी फायनल विरोधात राजकुमार छाजेड यांनी अमळनेर येथील न्यायालयात प्रोटेस्ट याचिका दाखल केली होती.

अभीष्टचिंतन

समस्त श्री मंगळग्रह मंदिर परिवाराचे आवडते सदस्य




मा. श्री. पुषंद (खिलूभाऊ) ढाके

यांना वाढदिवसाच्या अनेकोत्तम 'मंगलमय' शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *

श्री मंगळग्रह मंदिर परिवार.

संपादकीय



## संगतीला जीवनात अतिशय महत्त्व

आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा नकळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात, हे आपण पाहतो. समजा काही लोकांनी येथे यायचे ठरविले. एकाने विचार केला, की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले, तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वांत लवकर पोहोचेल. म्हणजेच ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी, की ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. येथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत येथे आल्यावर त्यांनी येथील मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे.

आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाईलाजाने तेथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात. एखादा साधू बैरागी असेल. तो स्वतः उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, की 'मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू , आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ.' पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाऱ्याला तो वाटेल ते खायला घालेल. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताच्या घरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहत असेल तेथून आपण लांब राहत असू; आणि जवळ राहत असलो तरी प्रपंच–कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल. तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय.

संतांचे जीवन आनंदमय असते. सुखच जणू त्यांच्या रूपाने आकाराला येते. त्रिविध ताप नष्ट करून सर्व प्रकारे संतुष्ट जीवन जगण्याची विद्या, कला संतांकडूनच शिकावी. संत श्रीमंत व उदार असतात म्हणून अतिशय दानशूर असतात. त्यांनी कितीही दिली तरी त्यांची ज्ञानरूप संपत्ती कधीच संपत नाही. सज्जन संगतीत सर्व गोष्टींचे मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था आहे. संत सज्जनांचे अत्यंत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी वेद, उपनिषदे, गीता, भागवत इत्यादी अनेक ग्रंथांचा अर्थ सोप्या भाषेत समजावून सांगितला. संस्कृत भाषेतील ज्ञान त्यांनी प्राकृत भाषेत सांगून ज्ञानाचे भांडारच सर्वांसाठी खुले केले. रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकारामांची गाथा इत्यादी ग्रंथांतून ज्ञानाची गंगा लोकांना उपलब्ध करून दिली. त्यामुळे मनातील शंका, संशय दूर करण्याचे सामर्थ्य फक्त आणि फक्त संत संगतीतच आहे.


# लाडक्या बहिणींना मोठा दिलासा

## केवायसीसाठी दिली ३१ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लाडकी बहिण योजनेतील लाभार्थींना ३१ मार्च २०२६ पर्यंत केवायसी बंधनकारक होती मात्र योजनेतील लाभार्थींना सरकारने मोठा दिलासा दिला आहे. केवायसीची मुदत एका महिन्यांनी वाढवण्यात आल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

केवळ निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना आता योजनेचा लाभया योजनेसाठी पात्र नसताना देखील अनेक महिला या योजनेचा लाभ घेत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आल्यानंतर सरकारने अशा महिलांची नाव या योजनेतून वगळण्यासाठी केवायसी बंधनकारक केली. या केवायसीसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत होती मात्र ज्या महिलांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत केवायसी केली नाही, त्या महिलांची नावं या योजनेतून वगळण्यात आली आहेत. मात्र अशा देखील काही महिला होत्या ज्यांनी केवायसी करूनदेखील तसेच त्या या योजनेसाठी पात्र असताना देखील त्यांची नाव या योजनेतून वगळण्यात आली होती, कारण त्यांच्या केवायसीमध्ये काही तांत्रिक चुका झाल्या होत्या.




दरम्यान त्यानंतर या तांत्रिक चुका दुरुस्त करण्यासाठी राज्य सरकारने लाभार्थी महिलांना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली होती.३१ मार्चपर्यंत या चुका दुरुस्त करून घ्याव्यात, असं आव्हान सरकारने केलं होतं. दरम्यान केवायसीला मुदत वाढ मिळावी अशी इच्छा अनेक लाभार्थी महिलांच्या मनात होती. अखेर ही इच्छा आता पूर्ण झाली आहे. लाभार्थी महिलांना आता केवायसी करण्यासाठी ३१ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी घोषणा केली आहे.

# कांतीलाल पहाडे यांचे मरणोत्तर देहदान


## अमळनेरच्या पहाडे परिवारातील द्वितीय प्रेरणादायी उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप मिल परिसरातील प्रमुख पेट्रोलपंपामागील रहिवासी कांतीलाल हिरालाल पहाडे (वय ९५) यांचे मंगळवार, ३१ मार्च २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर अमळनेर लायन्स क्लबच्या माध्यमातून धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात त्यांचे देहदान करण्यात आले. विशेष म्हणजे अमळनेर लायन्स क्लबच्या माध्यमातून पहाडे परिवारातील हे द्वितीय देहदान ठरले आहे.



याबाबत माहिती अशी, की गेल्या वर्षी महावीर पहाडे यांच्या मातोश्री कांताबाई पहाडे यांचेही देहदान करण्यात आले होते. कांतीलाल पहाडे यांनी यापूर्वीच लायन्स क्लबच्या माध्यमातून मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला होता. मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास त्यांचे निधन झाल्यानंतर लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी यांना कळविण्यात आले. त्यानंतर लायन्स सदस्य तत्काळ तेथे पोहोचले व धुळे येथील वैद्यकीय महाविद्यालयाशी संपर्क साधण्यात आला. सायंकाळी ५ वाजता सर्वांनी अंत्यदर्शन घेतल्यानंतर मृतदेह धुळे येथील शासकीय रुग्णालयात पोहोचवून रुग्णालय प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य तसेच पहाडे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर देहदान भावी डॉक्टरांच्या शिक्षणासाठी उपयुक्त ठरणार असून, यातून अनेक डॉक्टर घडण्यास मदत होणार आहे. इतर कुटुंबांनीही पहाडे परिवाराचा आदर्श घेऊन देहदानासाठी पुढे यावे, असे आवाहन अमळनेर लायन्स क्लबतर्फे करण्यात आले आहे. कांतीलाल पहाडे हे पवन व संजय पहाडे यांचे वडील होत.



## तुरा असलेला सुंदर पक्षी

पक्ष्यांची ओळख

**नाव :** हुदहुद Hoopoe

**रंग :** हा विविध रंगी पक्षी आहे. मान, छाती गुलाबी तपकिरी, पंखावर उठून दिसणारे काळे पांढरे पट्टे. डोक्यावर आकर्षक नारंगी तुरा व तुऱ्यावर शेवटी काळे पट्टे. शेपूट काळी.

**चोच :** लांब, अणकुचीदार, गडद, काळी. चोचीने हुदहुद पक्षी माती व लाकडात छिद्र पाडून कीटक शोधतो.

**डोळे :** हुदहुदचे डोळे लहान, गोल, तपकिरी, तेजस्वी, लुकलुकणारे.

**घरटे :** हुदहुद कडे–कपारीत, झाडांच्या बुंध्यात मानवी वस्तीजवळ उन्हाळ्यात घरटे तयार करतो.

**अंडी :** मादी मार्च महिन्यात चार–पाच अंडी घालते. सुरूवातीला ही अंडी राखाडी असतात, नंतर त्यांचा रंग तपकिरी होतो. उंदीर, साप यापासून अंड्यांचे संरक्षण करण्यासाठी निसर्गाने दुर्गंधीयुक्त रंग दिलेला आहे.

**भक्ष :** हुप्पो पक्षी लांब चोचीने जमिनीतून, झाडांमधून वाळवी, किडे, मुंग्या ड्रिल करून काढतो व खातो. पाल, सरडे, नाकतोडे हे त्याचे भक्ष आहे.

**आवाज :** हुदहुदचा स्वर फार मधूर नाही, पण लांब आहे. एकाच वेळेला तो तीनदा हूप हूप हूप आवाज काढतो व साथीदारांना बोलवितो.

**इतर वैशिष्ट्ये :** चोचीमुळे अनेकजण हुदहुदला सुतार पक्षी समजतात. या पक्षाची चोच ड्रील मशीनप्रमाणे काम करते. सगळ्या धर्मांच्या धर्मग्रंथांमध्ये हुदहुदचा संदर्भ आलेला आहे. डोक्यावर असलेल्या ऐटबाज तुऱ्याने हुदहुद लक्ष वेधून घेतो. हा पक्षी भारतभर आढळतो. अमळनेरमध्ये मारवड रस्ता, ढेकूरस्ता टेकडी, अंबर्षी टेकडी या गवताळ भागात हुदहुद दिसतो.

**संग्राहक :**
**प्रा. प्रकाश धर्माधिकारी, निसर्ग मित्रमंडळ, अमळनेर.**

# युद्ध के डर से जमीन में गाड़ दिया था खजाना

## पोते ने ८० साल बाद ढूंढ निकाला; खुदाई किस्मत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उपन्यासों में पढ़े खजाने अक्सर ख्वाब लगते हैं, लेकिन पोलैंड के ६९ वर्षीय जान ग्लाजेव्स्की के लिए यह कोई अफसाना नहीं रहा। उन्होंने अपने पिता के बनाए एक पुराने नक्शे पर यकीन किया और जब उसी के सहारे खुदाई की, तो मिट्टी के नीचे दबा इतिहास बाहर आ गया। यह खजाना दूसरे विश्व युद्ध के दौर से जुड़ा है, जिसे जान के दादा ने अपनी जान बचाने के लिए जमीन में छिपाया था।



### जंग और बिछड़ता हुआ परिवार

साल १९३९ में सोवियत सेना के खौफ के चलते जान के दादा एडम ग्लाजेव्स्की को अपनी हवेली छोड़कर भागना पड़ा। जाने से पहले उन्होंने सोने के सिक्के, चांदी के बर्तन और जेवरात जमीन में दफन कर दिए। जंग खत्म हुई, हवेली खंडहर बन गई, लेकिन खजाना वहीं सोता रहा।

### पिता का बनाया नक्शा

जान के पिता गुस्ताव ने अपने वालिद की निशानियों के आधार पर एक नक्शा तैयार किया था। वह नक्शा उन्होंने आखिरी सांस तक संभालकर रखा। बरसों बाद जान ने उसी नक्शे को सच मानकर यूक्रेन पोलैंड बॉर्डर के पास उस जगह खुदाई का फैसला किया।

### खुदाई और चमकती किस्मत

शुरुआत में कुछ नहीं मिला, लेकिन थोड़ी गहराई में जाते ही मिट्टी से सोने के सिक्के और चांदी के बर्तन झलकने लगे. १९ वीं और २० वीं सदी के ये सिक्के आज अंतरराष्ट्रीय बाजार में लाखों डॉलर के बताए जा रहे हैं। यह खबर सिर्फ दौलत की नहीं, बल्कि यादों, विरासत और इतिहास की है। यह दिखाती है कि जंग के जख्म पीढ़ियों तक कैसे साथ चलते हैं। यह खजाना सिर्फ सोना नहीं, एक खानदान की दास्तान है, जो ८० साल बाद मिट्टी से बाहर आई।

# उत्सव : आनंदाचा सोहळा की सांस्कृतिक अध:पतन ?

भारतीय संस्कृती ही मुळातच 'उत्सवप्रिय' आहे. मानवी जीवनातील नीरसता झटकून चैतन्य भरण्यासाठी आपल्या पूर्वजांनी सण आणि उत्सवांची गुंफण केली. मग ते लग्न असो, बारसे असो, शेंडी (जावळ) असो वा आपल्या लाडक्या महापुरुषांची जयंती. पण आजच्या आधुनिकतेच्या नावाखाली आपण या उत्सवांचे जे 'बीभत्स' प्रदर्शन मांडले आहे ते पाहून मन विषण्ण होते. विचारांना धरून आपले नियोजन असते का? हा प्रश्न आज प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

डीजे हा मांगल्याचा शत्रू आहे; पण आज कोणत्याही कार्यक्रमाच्या नियोजित यादीत 'डीजे' अग्रक्रमाने असतो. कितीही अवाढव्य खर्च लागला तरी चालेल, पण गल्ली हादरवणारा डीजे हवाच! आपल्याकडे सनई–चौघडा, तुतारी, ढोल–ताशा, संबळ आणि झांज पथकांसारखी पारंपरिक वाद्ये आहेत, जी अंगात वीरश्री आणि सात्विक उत्साह भरतात. पण आपल्याला वेड लागले आहे ते त्या 'धपाधप' बेसचे. हा आवाज केवळ कानच ठोठावत नाही, तर हृदयाचे ठोकेही अनैसर्गिकरीत्या वाढवतो. अनेक मिरवणुकीत आवाजाच्या अतिरेकाने हृदयविकाराचे झटके येऊन मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. आपण आनंदासाठी एकत्र येतो की जीव घेण्यासाठी?

### गाणी कोणती आणि कोणासमोर?

सर्वांत मोठी शोकांतिका म्हणजे आपली गाण्यांची निवड. ज्या नवरात्रात आपण साक्षात जगन्मातेचा, आदिशक्तीचा जागर करतो, तिथे आपण "हाय झुमका वाली पोर, नदी थडीले चालनी" किंवा "घागर नळाला लाव, पाणी सुटाया लागलं" सारख्या गाण्यांवर बेभान होऊन नाचतो. गणपती बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीत, ज्या देवाला आपण बुद्धीची देवता मानतो, त्यांच्यासमोर "कधी होणार गं राणी माझ्या लेकराची आई" किंवा "शालू के ठुमके" सारखी अश्लील गाणी वाजवली जातात.



आपल्या घरातील माता–भगिनी, लहान मुले आणि वयोवृद्ध शेजारी यांच्यासमोर आपण कोणत्या गाण्यावर ठेका धरतो, याचे भान आपल्याला उरलेले नाही. "व्हल्गर" गाणी आणि त्यावर केला जाणारा "उडणछू" नाच ही आपली संस्कृती नसून ती वैचारिक दिवाळखोरी आहे.

मुहूर्ताची थट्टा आणि वायफळ खर्च जो टाळता येणार आहे; पण आपणच त्यास फाटे देत नको ते करत बसतो. लग्नासाठी आपण मुहूर्त काढण्यासाठी गुरुजींचे पाय धरतो, चार महिने आधीपासून तयारी करतो. पण प्रत्यक्ष लग्नाच्या दिवशी काय होते? केवळ नाचायच्या धुंदीत नवरदेव रात्री ३–४ वाजता मांडवात पोहोचतो. त्या पवित्र मुहूर्ताची ही क्रूर थट्टा नाही का? लांबून आलेले पाहुणे, लहान मुले आणि वृद्ध माणसे ऊन, वारा, पावसात मरमर सोसतात. हा वायफळ खर्च आणि लोकांचा जीव धोक्यात घालून केलेली ही आयुष्याची सुरूवात सुखाची कशी असेल?

### इतरांकडून काय शिकावे?

आपण अनेकदा इतर समाजांना नावे ठेवतो, पण त्यांच्यातील चांगल्या गोष्टींचे अनुकरण मात्र करत नाही. मारवाडी आणि गुजराती समाज त्यांच्या मिरवणुका किंवा लग्नात असल्या निरर्थक गोष्टी करीत नाहीत. त्यांच्याकडेही 'वरघोडा' असतो, मोठे सोहळे असतात. पण त्यांच्या मिरवणुकांमध्ये अश्लीलतेचा स्पर्श नसतो. त्यांच्या धार्मिक उत्सवात आणि लग्नात गाण्यांची एक शिस्त आणि मर्यादा असते.

आजही ब्राह्मण व गुजर समाजात सकाळी लवकर लग्न लावण्याची पद्धत आहे. सकाळी ९ च्या आत लग्न आणि जेवण उरकून ते मोकळे होतात. काय हे लोक मौज–मजा करत नाहीत? नक्कीच करतात. पण त्यांच्या आनंदाला 'संस्कृतीची' जोड असते. आपण त्यांना शिव्या देण्यापेक्षा त्यांचा हा वेळेचा आणि सभ्यतेचा आदर्श घ्यायला काय हरकत आहे?

### परिवर्तन काळाची गरज

आपल्या भारतीय संस्कृतीत भजन, भारूड, पोवाडे आणि आशयघन लोकगीतांची इतकी मोठी खाण आहे, की त्यावर नाचतानाही मनाला तृप्ती मिळते. गरज आहे ती फक्त आपली मानसिकता बदलण्याची. आपण ठरवले तर एक आदर्श लग्न किंवा उत्सव लावू शकतो. जेथे संगीत मंजुळ असेल, गाणी अर्थपूर्ण असतील आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सात्विक आनंद असेल. पुढच्या पिढीला काय देणार? आपण आज जे वागतोय, तेच आपली मुले शिकत आहेत. अश्लील गाण्यांवर थिरकणारी पिढी घडवायची की समृद्ध संस्कृतीचा वारसा जपणारी, हे आज आपल्याला ठरवावे लागेल.

महापुरुषांचे उत्सव असोत की घरगुती कार्यक्रम, तेथे आपल्या महान संस्कृतीचे दर्शन घडायला हवे. अश्लीलता आणि धांगडधिंगा म्हणजे 'फॅशन' नाही, तर ती एक सामाजिक विकृती आहे. चला, स्वतःला बदलूया आणि आपल्या उत्सवांना पुन्हा एकदा 'मांगल्य' मिळवून देऊया.

**– धनंजय सोनार,**
**सामाजिक कार्यकर्ते,**
**अमळनेर.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# संगीतात मास्टर, कायद्याची पदवी घेऊन बनल्या आयएएस



## पल्लवी मिश्रा यांची थक्क करणारी यशोगाथा

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक असलेल्या यूपीएससीमध्ये यश मिळविण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता नाही, तर प्रबळ इच्छाशक्तीचीही गरज असते. हेच सिद्ध करून दाखवलंय भोपाळच्या पल्लवी मिश्रा यांनी. कायद्याची पदवी आणि शास्त्रीय संगीतात मास्टर्स केल्यानंतर, त्यांनी कोणत्याही महागड्या कोचिंगचा आधार न घेता ऑल इंडिया ७३ वा रैंक पटकावून आयएएस होण्याचे स्वप्न पूर्ण केले.

### संगीतापासून प्रशासनापर्यंतचा प्रवास

पल्लवी मिश्रा यांचे प्राथमिक शिक्षण भोपाळमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी दिल्लीच्या 'नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी'मधून कायद्याची पदवी संपादन केली. विशेष म्हणजे, शिक्षणासोबतच त्यांनी आपली शास्त्रीय संगीताची आवडही जोपासली. त्यांनी संगीतात मास्टर्स पूर्ण केले असून पंडित सिद्धराम स्वामी कोरवर यांच्याकडून संगीताचे शास्त्रोक्त शिक्षण घेतले आहे. मात्र, केवळ छंद जोपासणे हे त्यांचे ध्येय नव्हते, तर लोकसेवेच्या माध्यमातून देशाची सेवा करणे हे त्यांचे स्वप्न होते.

### पहिल्या प्रयत्नातील अपयश आणि पुनरागमन

पल्लवी यांनी जेव्हा पहिला प्रयत्न केला, तेव्हा त्यांना अपयशाचा सामना करावा लागला. मात्र, खचून न जाता त्यांनी आपल्या उणिवा शोधल्या. त्यांनी विशेषतः 'निबंध लेखना'वर लक्ष केंद्रित केले आणि सातत्याने सराव केला. स्वतःच्या नोट्स स्वतः काढणे आणि अभ्यासात सातत्य ठेवणे यावर त्यांनी भर दिला. परिणामी, २०२२ च्या निकालात त्यांनी ७३ व्या रँकसह अभूतपूर्व यश मिळवले.

### कुटुंबाची साथ आणि आयपीएस भावाची प्रेरणा

पल्लवी यांच्या यशात त्यांच्या कुटुंबाचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे वडील अजय मिश्रा हे वरिष्ठ वकील आहेत, तर आई डॉ. रेनू मिश्रा वैज्ञानिक आहेत. त्यांचे मोठे भाऊ आदित्य मिश्रा हे आधीच आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. भावाचा अनुभव आणि पालकांचा पाठिंबा यामुळे पल्लवी यांना कठीण काळातून सावरण्यास मोठी मदत झाली.

### सध्याची जबाबदारी आणि सोशल मीडिया

पल्लवी मिश्रा या जम्मू आणि काश्मीरमधील जम्मू जिल्ह्यातील मारह भागात उपविभागीय दंडाधिकारी (एसडीएम) म्हणून कार्यरत आहेत. त्या पर्यावरण संरक्षण, महिला शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या सामाजिक विषयांवर काम करण्यास उत्सुक आहेत. कामासोबतच त्या सोशल मीडियावरही सक्रिय असतात.


## राजर्षी शाहू महाराज राज्याभिषेक विशेष

# सामाजिक न्यायाच्या युगाची सुरूवात

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मराठा साम्राज्याच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. २ एप्रिल १८९४ हा त्यांच्या राज्याभिषेकाचा दिवस केवळ राजकीय घटना नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाची सुरूवात होती. हा सोहळा प्रजेच्या कल्याणासाठी झटणाऱ्या एका द्रष्ट्या राजाच्या कार्याचा प्रारंभबिंदू ठरला.





### ऐतिहासिक पार्श्वभूमी

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे बालपण अनेक आव्हानांनी भरलेले होते. पुढे ते कोल्हापूर संस्थानचे अधिपती झाले. त्यांच्या राज्याभिषेकामुळे केवळ सत्तेचा हस्तांतरण झाला नाही, तर समाजातील वंचित, दुर्बल घटकांना न्याय देण्याची नवी दिशा मिळाली.

### राज्याभिषेक सोहळ्याचे महत्त्व

शाहू महाराजांचा राज्याभिषेक अत्यंत भव्य आणि पारंपरिक पद्धतीने पार पडला. या सोहळ्याला विविध मान्यवर, सरदार आणि सामान्य प्रजाजन मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजमुकुट धारण करताना त्यांनी प्रजेच्या कल्याणाची शपथ घेतली आणि 'सर्वांसाठी समान न्याय' ही भूमिका स्पष्ट केली.

### सामाजिक सुधारक म्हणून योगदान

राज्याभिषेकानंतर शाहू महाराजांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यांनी शिक्षण सर्वांसाठी खुले केले आणि मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची संकल्पना राबवली. अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री शिक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न यावर त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यांच्या धोरणांमुळे समाजात समता आणि बंधुता यांची जाणीव वाढली.

### शिक्षण क्षेत्रातील क्रांती

शाहू महाराजांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. त्यांनी गरीब आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना सुरू केल्या. त्यामुळे अनेकांना उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला.

### आजच्या काळातील प्रेरणा

आजही छत्रपती शाहू महाराजांचे विचार समाजासाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या राज्याभिषेकाचा दिवस आपल्याला समानता, न्याय आणि मानवतेची जाणीव करून देतो. सामाजिक समतेसाठी त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. छत्रपती शाहू महाराजांचा राज्याभिषेक हा केवळ एक ऐतिहासिक प्रसंग नव्हता, तर समाज परिवर्तनाचा प्रारंभ होता. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राला प्रगत आणि समताधिष्ठित दिशा मिळाली. म्हणूनच, त्यांच्या राज्याभिषेकाची आठवण म्हणजे सामाजिक न्याय आणि लोककल्याणाच्या मूल्यांची पुनःप्रत्ययकृती होय.



# सावली...

एआय इमेज

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

'म्हाताऱ्याला आश्रमात टाका आणि घर विका!' रात्री सुनेचे ते शब्द बापाने ऐकले... पण सकाळी बापाने 'ते' कागदपत्र पोराच्या हातात ठेवताच लेक आणि सून पायावर पडून ढसाढसा रडले...

कोकणच्या कुशीत वसलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात, जिथे आंब्याच्या बागा आणि नारळाची झाडी बाराही महिने हिरवीगार असतात, तिथे 'सूर्याजीराव' आपल्या जुन्या, कौलारू घरात राहत होते. सूर्याजीराव हे पेन्शनधारक प्राथमिक शिक्षक. अत्यंत स्वाभिमानी आणि सरळमार्गी माणूस. आयुष्यभर कष्टाने त्यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाला, 'अनिकेत'ला पुण्यात शिकवून इंजिनिअर बनवले होते. अनिकेतचे लग्न झाले होते आणि तो पत्नी 'स्नेहा' सोबत पुण्यातच स्थायिक झाला होता.

सूर्याजीरावांच्या पत्नीचे पाच वर्षांपूर्वी निधन झाले होते. तेव्हापासून ते या मोठ्या घरात एकटेच असायचे. अनिकेत आणि स्नेहा वर्षातून एकदा किंवा दोनदा दिवाळी-गणपतीला येत असत. पण सूर्याजीरावांना कधीच त्याची खंत वाटली नाही. त्यांना वाटायचे, मूल कष्टाने शिकले आहे, आता त्याचे आयुष्य तो जगतोय, त्यात अडथळा कशाला बना?

यावेळी मात्र अनिकेत आणि स्नेहा अचानक मे महिन्यातच गावी आले होते. सूर्याजीरावांना खूप आनंद झाला. त्यांनी स्नेहाच्या आवडीची केळीची शिकरण आणि अनिकेतला आवडणारे तळलेले फणस बनवले. रात्री जेवण झाल्यावर सूर्याजीराव आपल्या लाकडी आरामखुर्चीत अंगणात बसले होते. वारा सुटला होता आणि आकाशात चांदणे लकाकत होते.

अनिकेत आणि स्नेहा आतल्या खोलीत सामान लावत होते. जुन्या घरच्या भिंती थोड्या कुळकुळीत झाल्या होत्या, त्यामुळे आतला आवाज बाहेर सहज येत होता. सूर्याजीराव गाणी गुणगुणत होते, पण अचानक स्नेहाचा थोडा चढलेला आवाज त्यांच्या कानावर पडला आणि त्यांचे गुणगुणणे थांबले.

स्नेहा म्हणत होती, की अनिकेत, आता बास झाले. मी यापुढे हे सहन करू शकत नाही. तुझी कंपनी तुला दोन वर्षांसाठी जर्मनीला पाठवतेय, ही केवढी मोठी संधी आहे! आणि तू काय म्हणतोयस? बाबांना एकटे सोडून कसे जाऊ?

अनिकेतचा दबलेला आवाज आला, 'पण स्नेहा, बाबा म्हातारे झालेत. आता 80 वर्षांचे आहेत. त्यांना गावी एका विसकटलेल्या घरात एकटे सोडून आपण सात समुद्रापार कसे जाणार? त्यांची तब्येत बिघडली तर कोण बघणार?'

'तब्येत बिघडली तर बघायला येथील शेजारी आहेतच की' स्नेहा उपहासाने म्हणाली. 'आणि जर्मनीहून आपण जे पैसे कमावू, त्यातून त्यांची सर्व काळजी घेता येईल. बघ अनिकेत, माझी नोकरी, तुझी बढती आणि आपल्या मुलाचे भविष्य... या सगळ्या आड तुझे बाबा येत आहेत. त्यांना पुण्याला न्यायचे तर तिथे आपली जागा छोटी पडते, त्यांची औषधपाणी, त्यांची रोजची कटकट... माझ्याने हे सांभाळले जाणार नाही.'

अनिकेत काहीच बोलला नाही, कदाचित तो स्नेहाच्या बोलण्यावर विचार करत होता. पण स्नेहा पुढे जे बोलली, त्याने सूर्याजीरावांच्या हृदयाचे अक्षरशः हजार तुकडे झाले.

स्नेहा म्हणाली, 'आता एकच पर्याय आहे. या घराची अवस्था बघ, जिकडे तिकडे गळती लागली आहे. हे घर विकून टाकू. बापाने आयुष्यभर जे काही कमावले आहे, ते आता मुलाच्या कामी यायला हवे. हे घर विकून जो पैसा येईल, त्यातून पुण्यात नवीन थ्री-बीएचके फ्लॅट घेऊ. आणि बाबांना? रत्नागिरीत एक खूप चांगले, 'प्रीमियम' वृद्धाश्रम आहे. तेथे त्यांची राहण्याची, खाण्याची उत्तम सोय आहे. महिन्याला त्यांना पैसे पाठवू, म्हणजे तुला जर्मनीला जाताना काही काळजी वाटणार नाही. हे घर विकल्याशिवाय आपला पुण्यातला फ्लॅट आणि जर्मनीची वारी होणार नाही, हे पक्के लक्षात ठेव.'

सूर्याजीरावांना वाटले, त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. ज्या मुलाला त्यांनी या घराच्या अंगणात खेळताना बघितले, ज्या घराच्या भिंतींनी त्यांच्या पत्नीचे अस्तित्व जपले होते, ते घर विकून स्वतःचा बाप वृद्धाश्रमात टाकायचा विचार त्यांचा मुलगा करत होता. जर्मनीतल्या नोकरीसाठी आणि पुण्यातल्या मोठ्या घरासाठी आप्पा आता 'ओझे' झाले होते. सूर्याजीरावांच्या डोळ्यातून पाणी घळघळा वाहू लागले. त्यांनी स्वतःला सावरले आणि हळूच घराबाहेर पडले. रात्रभर ते गावातल्या देवळात बसून राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी, अनिकेत आणि स्नेहा उठले, तेव्हा घर शांत होते. सूर्याजीराव घरात नव्हते. त्यांना वाटले, बाबा नेहमीप्रमाणे पहाटे फिरायला गेले असतील. पण नऊ वाजले तरी ते आले नाहीत. अनिकेतला थोडी काळजी वाटू लागली. तो उठून अंगणात आला, तेव्हा आरामखुर्चीवर एक पांढरे पाकीट ठेवलेले दिसले. त्यावर अनिकेतचे नाव लिहिले होते.

अनिकेतने थरथरत्या हाताने पाकीट उघडले. आत काही कागदपत्रे आणि एक पत्र होते. सूर्याजीरावांच्या हस्ताक्षरातले पत्र वाचताना अनिकेतचा श्वास कोंडला.

सूर्याजीरावांनी लिहिले होते, 'प्रिय अनिकेत आणि सूनबाई स्नेहा, काल रात्री मी तुमच्या दोघांचे बोलणे ऐकले. स्नेहा, तू म्हणलीस ते खरेच आहे. म्हातारपण हे ओझेच असते. आणि मी नाही इच्छित की माझ्या मुलाच्या प्रगतीत, त्याच्या जर्मनीच्या वारीत किंवा पुण्यातल्या मोठ्या घरात मी अडथळा बनावे. तू म्हणत होतास ना अनिकेत, की म्हातारपणी बाबांची काळजी कोण बघणार? त्याची चिंता नको करू. मी काल रात्रीच रत्नागिरीतल्या 'सावली वृद्धाश्रमा'त जाऊन माझी राहण्याची सोय केली आहे. तिथे मला तुमच्यासारखेच अनेक समवयस्क मित्र मिळतील. मी आजच तिथे शिफ्ट होत आहे. आता राहीला प्रश्न या घराचा. अनिकेत, तुला माहीत आहे ना, हे घर तुझे आजोबांनी बांधले होते. मी हे घर कधीच विकू शकत नाही, कारण इथे तुझ्या आईचे अस्तित्व आहे, तुझी आठवण आहे. पण तुला पुण्यात नवीन घर घेण्यासाठी पैशांची गरज आहे, जर्मनीत जाण्यासाठी पैशांची गरज आहे. मी या पत्रासोबत एक नवीन विल आणि घरगुती कागदपत्रे जोडली आहेत. मी हे घर गावातील ग्रामपंचायतीला आणि स्थानिक शाळेला दान केले आहे. या जुन्या घराची दुरुस्ती ग्रामपंचायत करेल. येथे गावातील गरीब मुलांसाठी एक 'वाचनालय' आणि 'अभ्यासिका' सुरू केली जाईल. शाळेतील मुलांना राहण्यासाठी वसतिगृह म्हणूनही याचा वापर करता येईल. हो, पण मी घर दान केले तरी, ग्रामपंचायतीने मला एक वचन दिले आहे. जोपर्यंत मी जीवंत आहे, तोपर्यंत या घराच्या एका कोपऱ्यात, आईच्या खोलीत, मला राहण्याची परवानगी आहे. म्हणजे मी वृद्धाश्रमात न जाता, याच घराच्या एका कोपऱ्यात, आईच्या आठवणींसोबत आणि गावातील मुलांच्या सहवासात माझे उरलेले आयुष्य काढीन. तुमची अडचण मी सोडवली आहे. आता तुम्हाला घर विकण्याची गरज नाही, आणि पुण्यातल्या मोठ्या घरासाठी माझे पेन्शन मी वृद्धाश्रमात देण्याऐवजी ग्रामपंचायतीला देईन, म्हणजे घराची निगा राखता येईल.
तुम्ही सुखाने जर्मनीला जा. स्नेहा, नवीन घरासाठी शुभेच्छा. तुमचे भविष्य उज्ज्वल असो.
तुमचा सावलीचा त्याग करणारा,
बाबा.'

अनिकेत आणि स्नेहाने ते कागदपत्रे बघितली. त्यावर सूर्याजीरावांनी घर ग्रामपंचायतीला दान केल्याची सही-शिक्का होता. हे वाचल्यावर अनिकेतच्या आणि स्नेहाच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांना वाटले होते, बाबा रागावतील, भांडतील, कदाचित पैसे देणार नाहीत. पण सूर्याजीरावांनी जे केले, ते त्यांच्या कल्पनेपलीकडचे होते. त्यांनी पोटच्या मुलाला, त्याच्या प्रगतीला, त्याच्या सुखाला मुकले नव्हते. त्यांनी स्वतःचा स्वाभिमान, पत्नीचे अस्तित्व आणि गावातील मुलांचे भविष्य... हे सर्व जपले होते.
अनिकेतने धावतच ग्रामपंचायतीच्या दिशेने धाव घेतली. तो धावत सूर्याजीरावांच्या जवळ गेला. सूर्याजीराव तिथेच उभे होते, त्यांच्या हातात एक छोटीशी पिशवी होती. ते ग्रामपंचायतीच्या सदस्यांशी बोलत होते. अनिकेतने त्यांच्या पायांवर डोके ठेवले आणि ढसाढसा रडू लागला.
'बाबा, मला माफ करा. मी चुकलो. मी पैशाच्या माजात, जर्मनीच्या वारीत इतका आंधळा झालो होतो की मी माझ्या जन्मदात्या बापाला, माझ्या सावलीला वृद्धाश्रमात टाकायचा विचार केला. तुम्ही घर दान केलेत, हे पाहून माझी लायकी काय, हे मला समजले. तुम्ही दिलेली शिक्षण, तुमचे कष्ट... मी सर्व काही विसरलो होतो. बाबा, आम्हाला सोडून वृद्धाश्रमात जाऊ नका. आम्ही घर विकणार नाही, जर्मनीला जाणार नाही. आम्हाला फक्त तुमची सावली हवी आहे.'
स्नेहा पण मागे उभी होती, तिच्या डोळ्यांतही पाणी होते. तिलाही तिच्या शब्दांची लाज वाटत होती. सूर्याजीरावांनी अनिकेतच्या डोक्यावरून हात फिरवला. त्यांच्या डोळ्यातले पाणी पुसले. ते शांत आवाजात म्हणाले, 'बाळा, शिक्षण दिले, म्हणजे मी तुझे आयुष्य खरेदी केले नाही. तुला तुझ्या प्रगतीसाठी जे करायचेय, ते तू कर. मी वृद्धाश्रमात नाही जाणार, मी या घरातच राहीन, तुझ्या आईच्या खोलीत. आणि हे घर आता ग्रामपंचायतीचे आहे, तेथे गरीब मुले शिकतील. माझा आत्मा तेथेच राहील. तू जर्मनीला जा, स्नेहा सुखात राहा. मी येथेच आहे.'
अनिकेतने बापाला मिठी मारली. त्या दिवशी अनिकेतने आपल्या पुरुषी अहंकाराचा त्याग करून एका बापाचा स्वाभिमान आणि सावलीचा त्याग स्वीकारला. घर विकले गेले नाही, पण सूर्याजीरावांनी आपल्या त्यागाने आपल्या मुलाचा आत्मा वाचवला होता. गावातल्या शाळेतून येणाऱ्या मुलांच्या आवाजात सूर्याजीरावांना आपल्या आईची गाणी ऐकू येऊ लागली आणि त्यांनी आपली कापडी पिशवी पुन्हा आरामखुर्चीच्या बाजूला ठेवली. त्या रात्री अनिकेतच्या मुलाच्या शाळेच्या फीची ३०,००० रुपये फी सूर्याजीरावांनी ग्रामपंचायतीच्या अभ्यासिका निधीतून दिली होती...

**(टीप : ही कथा पूर्णपणे खरी आहे. तिचा कोणत्याही व्यक्तीशी, घटनेशी, ठिकाणाशी किंवा टीव्ही/चित्रपटाशी कोणताही संबंध नाही. कोणत्याही विशिष्ट कथेशी कोणतेही साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.)**

# 'कांतारा' प्रकरणामुळे अभिनेता रणवीर सिंह ट्रोल

## देवतेची नक्कल करणे भोवले; आता चामुंडी हिल्सवर जाऊन मागणार माफी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




'कांतारा' या चित्रपटातील पवित्र देवतेची नक्कल केल्यामुळे अभिनेता रणवीर सिंह हा प्रचंड ट्रोल झाला होता. नेटकऱ्यांनी तसेच देवतेला मानणाऱ्यांनी अभिनेत्यावर टीकेचे तोफ डागली. या प्रकरणी कर्नाटक उच्च न्यायालयात सुनावणी झाली. रणवीर सिंहने या प्रकरणी माघार घेतली आहे. आपण म्हैसूरच्या चामुंडी हिल्सवर जाऊन देवतेची माफी मागणार, अशी ग्वाही देखील दिली. यामुळे या वादावर आता पडदा पडण्याची शक्यता आहे.

नेमके प्रकरण काय?

२०२५ या वर्षी गोव्यात (आयएफएफआय) चा सोहळा पार पडला होता. या सोहळ्यात रणवीर सिंह उपस्थित होता. त्याने 'कांतारा चॅप्टर १' या चित्रपटातील दैव परंपरेची तसेच अभिनेता ऋषभ शेट्टीची नक्कल केली. तसेच पवित्र देवतेचा उल्लेख त्याने स्त्री भूत असा केला होता. त्याने केलेल्या नक्कलनंतर अभिनेता रणवीर सिंह प्रचंड ट्रोल झाला. भारतासह कर्नाटकातील लोकांच्या हिंदू भावना दुखावल्या गेल्या.

व्हिडिओ व्हायरल होताच हिंदूंमध्ये संतापाची लाट उसळली. काहींनी अभिनेत्याविरोधात तक्रार दाखल केली. बेंगळुरूच्या हायग्राउंड्स पोलीस ठाण्यात रणवीर सिंहविरोधात तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. अभिनेत्याविरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर हे प्रकरण कोर्टापर्यंत गेले. न्यायालयामध्ये न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांनी अभिनेत्याला चांगलेच फटकारले.

रणवीरच्या वतीने केस लढणारे वकील साजन पूवय्या यांनी न्यायालयात बाजू मांडली. रणवीरची बाजू सांगताना वकील म्हणाले, की 'रणवीरला पश्चाताप होतो आहे. न्यायालयात ॲफिडेव्हिट सादर करणार आहोत. तसेच तो म्हैसूर येथील चामुंडी हिल्सवर जाऊन देवीचे दर्शन घेऊन माफी मागेल', असे वकील म्हणाले.

अभिनेता रणवीर सिंह सध्या धुरंधर २ मुळे चर्चेत आहे. त्याचा चित्रपट बॉक्स ऑफिसवर प्रचंड गाजत आहे. दरम्यान, या प्रकरणात रणवीरची भूमिका समोर आल्याने त्याचे कौतुक होत आहे. दरम्यान, रणवीर सिंह माफी मागण्यासाठी मंदिरात कधी जाणार? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. सध्या या प्रकरणामुळे रणवीर सिंह पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# हनुमान जयंती केव्हा आहे?

## जाणून घ्या नेमकी तारीख; या दिवशी मारुतीला कसे प्रसन्न कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौराणिक कथेनुसार हनुमानजींना पुनुरुजीवन देण्यात आलेला दिवस सुद्धा हनुमान जयंती म्हणून साजरी करतात. यंदाची हनुमान जयंती ही चैत्र शुक्ल पौर्णिमेला अर्थात गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी साजरी करण्यात येणारी हनुमान जयंती आहे. पौर्णिमेच्या शुभ तिथीवर हनुमानजींचा जन्म झाल्याचे सांगण्यात येते. मात्र यंदाची पौर्णिमा तिथी ही दोन दिवस असल्याने हनुमान जयंती नेमकी केव्हा साजरी करायची याबाबत थोडा संभ्रम आहे. हनुमान जयंतीच्या दिवस सर्व मारुती मंदिरात छान सजावट केली जाते. काही ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. हनुमानजींची विधिवत पूजा करून या दिवशी सर्वत्र हनुमान जयंती मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी केली जाते.

**हनुमान जयंतीची तारीख**
**पौर्णिमा तिथी प्रारंभ :** १ एप्रिल २०२६ - सकाळी ७ वाजून २ मिनिटांनी
**पौर्णिमा तिथी समाप्ती :** २ एप्रिल २०२६ -सकाळी ७ वाजून ४२ मिनिटांनी

उदय तिथीनुसार पौर्णिमा तिथी २ एप्रिलला असल्याने याच दिवशी हनुमान जयंती साजरी करण्यात येईल.

**हनुमान जयंतीला कोणता मंत्र म्हणावा**

हनुमानजींना प्रिय आहेत प्रभू श्रीराम. त्यामुळे जर हनुमानजींना या दिवशी प्रसन्न करायचे असेल किंवा मनोकामना पूर्ण करायची असल्यास निरंतर 'रामनाम' जप करू शकता. तसेच हनुमान जयंतीच्या दिवशी संकल्प घेऊन १ ते ११ माळा किंवा इच्छेनुसार जमेल तितका रामनाम जप करा. रामनाम जप लिहू शकता. हनुमानजींच्या समोर जितक्या वेळा रामनाम आनंदाने घ्याल तितके हनुमानजी प्रसन्न होतील. त्यामुळे मनोकामनापूर्तीसाठी सर्वात प्रभावी मंत्र म्हणजे 'जय श्रीराम'.

**हनुमानजींची पूजा कशी करावी**

हनुमान जयंतीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करावे व स्वच्छ कपडे घालावेत. त्यांनतर हनुमानजींचा फोटो किंवा मूर्तीची पूजा करावी. चमेलीच्या तेलात सिंदूर लपून हनुमानजींना त्याचा टिळा लावावा. हार फुले हनुमानजींना अर्पण करावीत. लाडू,केली,फळे,चणे फुटाणे गूळ यापैकी कोणताही नैवेद्य हनुमानजींना दाखवावा. चमेलीच्या तेलाचा दिवा लावून धूप अगरबत्ती लावून हनुमानजींची पूजा करावी. यावेळी मनात रामनाम जपावे. हनुमान चालीसा पाठ करावा. रामस्तुती म्हणावी व सर्वात शेवटी हनुमानजींची आरती करून प्रसाद वाटावा.

# हनुमान जयंती वर्षातून दोनदा का असते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौराणिक कथा व हिंदू पंचांगानुसार कार्तिक आणि चैत्र महिन्यात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. याचा अर्थ हनुमान जयंती वर्षातून दोनदा येते. आता यामागचे कारण काय असा प्रश्न अनेक भक्तांना पडतो. कारण हनुमान जयंती हा एकमेव उत्सव दोनदा साजरा करण्यात येतो. चला तर मग पाहूया हनुमान जयंती वर्षातून दोनदा का साजरी करतात.

**हनुमान जयंती कथा**

कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशीला मंगळवारी हनुमानजींचा जन्म झाला असे पौराणिक कथेतून समजते. तो दिवस हनुमान जयंती म्हणून साजरा केला जातो. मात्र चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला देखील हनुमान जयंती साजरी करतात. यामागे देखील एक पौराणिक कथा आहे. चैत्र महिन्यातील हनुमान जयंतीचे महत्व फार मोठे आहे. चैत्र महिन्यातील हनुमान जयंती व कार्तिक महिन्यात हनुमान जयंती का साजरी करतात पाहुयात काय सांगतात धार्मिक कथा.

**चैत्र महिन्यातील हनुमान जयंती कथा**

चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला हनुमानजींना नवीन जीवन प्राप्त झाले अशी पौराणिक कथा आहे. हनुमानजींकडे लहानपणापासूनच अलौकिक शक्ती होत्या. लहान असताना भूक लागली म्हणून त्यांनी तळपत्या सूर्यालाच फळ समजून गिळंकृत केले होते. त्यानंतर पृथ्वीवर अंधार पडला. हे इंद्र देवाला समजताच त्यांनी बाल हनुमानांवर आपल्या शास्त्राने वार केला. हनुमानजींचे पिता पवनदेवाला हे समजताच ते क्रोधित झाले आणि त्यांनी वायूप्रवाह थांबवला यामुळे पृथ्वीर अजारकता पसरली. हवेच्या अभावामुळे त्राही झाली. तेव्हा ब्रम्हदेवांना हस्तक्षेप करावा लागला. ब्रम्हदेवाने पवनदेवांना शांत केले व हनुमानजींना जीवित केले तो दिवस होता चैत्र महिन्यातील पौर्णिमेचा. यादिवशी हनुमानजींना पुनरुज्जीवन मिळाल्याने भक्त आपल्या आराध्याची जयंती या दिनी आनंदाने साजरी करतात.

**कार्तिक महिन्यातील हनुमान जयंती कथा**

कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्दशी तिथीला स्वाती नक्षत्रात मंगळवारी हनुमानजींचा जन्म झाला त्यामुळे हा दिवस हनुमान जयंती म्हणून सगळीकडे साजरा करण्यात येतो. हनुमानजी रामभक्त आहेत हे आपण जाणतो. ते चिरंजीवी आहेत असे मानले जाते. त्यामुळे हनुमानजींना प्रसन्न करणे फार सोपे आहे. मात्र त्यासाठी पवित्र मनाने भक्ती करावी लागते. भक्तांना संकटातून वाचवण्याचे काम हनुमानजी करतात म्हणून तर त्यांना संकटमोचन असे म्हणतात. कार्तिक महिन्यात हनुमानजींचा जन्म झाल्याने ही जयंती महत्वाची मानली जाते.

हनुमान जयंती विशेष

# कसे पडले 'हनुमान' नाव? व्रताचे महत्त्व काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमान जयंती हे व्रत आहे. ज्या पंचांगाच्या आधाराने या व्रताचा निर्णय घेतला जातो त्यापैकी काहींच्या मते हनुमान जन्मतिथी अश्विन वद्य चतुर्दशी आहे, तर काहींच्या मते ती चैत्र शुद्ध पौर्णिमा आहे. कोणत्याही देवतेची जन्मतिथी ही एकच असते; फक्त हनुमानजींच्या बाबतीत असे दुमत आहे. हे याचे एक वैशिष्ट्य होय. याविषयीच्या ग्रंथात दोन्ही तिथींचे उल्लेख आहेत. परंतु त्यामधील आशयात फरक आहे. पहिला दिवस 'जन्मदिवस' म्हणून व दुसरा 'विजयाभिनंदनाचा महोत्सव दिवस' सांगितला आहे.

'उत्सवसिंधु' नामक ग्रंथात लिहिले आहे, की अश्विन वद्य चतुर्दशी, मंगळवार, स्वातिनक्षत्र, मेषलग्न या सुमुहूर्तावर प्रत्यक्ष शिवशंकरांनी अंजनीच्या उदरी हनुमानजींच्या रूपाने जन्म घेतला. 'व्रतरत्नाकर' मध्येही असेच म्हटले आहे, की अश्विन व भूततिथीला (चतुर्दशीला) मंगळवारी रात्री (महानिशा) अंजनीच्या उदरी हनुमानजींचा जन्म झाला. पूर्वोक्त ग्रंथात स्वाती नक्षत्र व मेषलग्न हे अतिरिक्त उल्लेख आहेत. परंतु कार्तिक पौर्णिमेस कृत्तिका नक्षत्र असल्यामुळे वद्य चतुर्दशीला चित्रा किंवा स्वाती नक्षत्र असेल ही गोष्ट संभवनीय नाही.

याच्या उलट 'हनुमदुपासनाकल्पद्रुम' नामक ग्रंथात- हा एका महाविद्वान पंडिताने लिहिलेला संकलन-ग्रंथ आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमेला मंगळवारी मूंजगवती मेखला असलेल्या, कौपिन वस्त्रधारी आणि यज्ञोपवीत धारण केलेल्या हनुमानजींचा जन्म झाला, असा उल्लेख आहे. त्याचबरोबर असेही लिहिले आहे, की (पुत्रकामेष्टी) यज्ञप्रसाद म्हणून कैकेयीला मिळलेल्या पिंडाचा अंश घारीमार्फत अंजनीला मिळाला. तो भक्षण केल्यामुळे तिच्या उदरी हनुमंताचा जन्म झाला. हा भाग असंबद्ध वाटतो.



कारण स्कंदादी पुराणांतील अनेक कथांवरून असे दिसते, की हनुमानजींचा जन्म श्रीरामांच्या बऱ्याच अगोदर झाला असला पाहिजे.

रामचरित्राच्या संशोधनाच्या दृष्टीने वाल्मीकी रामायण अधिक मान्य समजले जाते. रामायणाच्या किष्किंधा कांडाच्या ६६ व्या सर्गात हनुमान जन्मकथा आहे. त्यावरून एक गोष्ट कळून येते, की अंजनीच्या उदरी हनुमानजींचा जन्म झाला. जन्म पावताच क्षुधाग्रस्त झालेल्या हनुमंतजींनी आकाशात झेप घेतली आणि उगवता सूर्य हे एक पक्व फळ आहे, असे समजून त्याकडे उड्डाण केले. त्या दिवशी पर्वतिथी (अमावास्या) असल्यामुळे सूर्याला ग्रासण्यासाठी राहू आला होता. परंतु सूर्याच्या दिशेने उड्डाण करीत येणारा हनुमानजी हा दुसरा राहू आहे, असे समजून इंद्राने त्याच्यावर वज्रप्रहार केला. त्यामुळे त्याची हनुवटी छाटली गेली. म्हणून त्याला 'हनुमान' असे नाव पडले. या कथा भागात चैत्र किंवा कार्तिक या महिन्यांचा नामनिर्देश नाही. इतर ग्रंथात कल्पनाभेदामुळे अथवा अपसमजुतीने चैत्र मासाचा उल्लेख केला गेला असावा.

हनुमानाचे एक जन्मटिपणही आहे. त्यात चतुर्दशी तिथी, मंगळवार, चित्रानक्षत्र यांचा उल्लेख आहे. पण महिन्याचे नाव नाही. कुंडलीमध्ये सूर्य, मंगळ, गुरू, भृग आणि शनी हे उच्चीचे ग्रह असून ते अनुक्रमे ४, १, ७, ३, आणि १० या स्थानी आहेत. ही स्थिती पाहता, हनुमंतजींचा जन्म अश्विन व. चतुर्दशीला रात्री झाला असावा, असे अनुमान निघते आणि चैत्र शुद्ध पौर्णिमेला सीताशोध, राक्षसांचे उपमर्दन, लंकादहन, समुद्रोल्लंघन आदी गोष्टीत विजय मिळवून हनुमानजी निर्विघ्नपणे परत आल्याबद्दल वानरांनी मोठ्या आनंदाने विजयोत्सव साजरा केला होता आणि सर्व नर-वानर सुखी झाले होते. म्हणून या दोन्ही दिवशी व्रतोत्सव केल्यास **'अधिकस्य अधिकं फलम् ।'**

या व्रतासाठी तात्कालीक किंवा रात्रिव्यापिनी तिथी ग्राह्य समजतात. ही तिथी दुपक असेल तर, व्रत दुसऱ्या दिवशी करावे. व्रत करणाराने हनुमान जयंतीच्या व्रतानिमित्त धनत्रयोदशीच्या रात्री रामसीता आणि हनुमंतजींचे स्मरण करीत भूमिशयन करावे व रूपचतुर्दशीला अरुणोदयापूर्वी उठून श्रीराम-सीता आणि हनुमानजी यांचे पुन्हा स्मरण करून प्रातःस्नानादी नित्यकर्मे लवकर उरकावी. नंतर हातामध्ये उदक घेऊन **ममाखिलानिष्टनिरसनपूर्वकसकलाभीष्टसिद्ध तेजोबलबुद्धिविद्याधनधान्यसमृद्धयायुरारोग्य च हनुमद्व्रतं तदङ्गीभूतपूजनं च करिष्ये ॥** असा संकल्प करावा. हनुमानजींच्या पूर्वीच प्रतिष्ठापित प्रतिमेसमीप पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख बसावे आणि अत्यंत विनीत भावाने **अतुलितबलधामं स्वर्णशैलाभदेहं दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम् । सकलगुणनिधानं वानराणामधीशं रघुपतिवरदूतं वातजातं नमामि ॥**

अशी प्रार्थना करावी आणि यथाविधी षोडशोपचार पूजा करावी. स्नानासाठी जवळ उपलब्ध असेल तर नदीचे पाणी घ्यावे, नाहीतर श्रीजलमिश्रित विहिरीचे पाणी घ्यावे. वस्त्र म्हणून लाल कौपीन किंवा पीतांबर, गंध म्हणून केशरमिश्रित चंदन घ्यावे. मूंज गवताचे यज्ञोपवीत अर्पण करावे. फुले म्हणून शतपत्रे (हजार), केवड्याची पाने, कण्हेरी किंवा अन्य पिवळी फुले घ्यावी. धूप म्हणून अगरु, तगरादि घ्यावा. तुपाची वात दीप म्हणून लावावी. तुपात तळलेले अनरसे किंवा तुपात तळलेले गुळमिश्रित उकडीचे मोदक किंवा केळी वगैरे फळे नैवेद्यास घ्यावी. आरती, नमस्कार, पुष्पांजली आणि प्रदक्षिणा झाल्यावर **मनोजवं मारुततुल्यवेगं जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठं । वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शिरसा नमामि ॥**

अशी प्रार्थना करून प्रसाद वाटावा आणि शक्य असेल तर ब्राह्मणभोजन घालून स्वतः जेवावे. दिपोत्सव, स्तोत्रपाठ, गायन, वादन, कीर्तन वगैरे गोष्टी यथासंभव करून रात्र जागवावी.

एखाद्या कार्यसिद्धीच्या उद्देशाने व्रत करावयाचे असेल तर मार्गशीष शुद्ध त्रयोदशीला प्रातःस्नान वगैरे उरकून एका वेदीवर अक्षतांच्या पुंजीची तेरा कमळे काढावी. त्यावर यथाविधी पूजा केलेला जलपूर्ण कलश स्थापन करावा. त्यावर पिवळे वस्त्र घालावे. त्यावर १३ कमळांच्या १३ गाठी घातलेला नऊ पदरी पिवळा दोरा ठेवावा. नंतर वेदीची पूजा करावी. उपरोक्त विधीनुसार हनुमंताची पूजा, जप, ध्यान, उपासना आदी गोष्टी कराव्यात. ब्राह्मणभोजन घालून स्वतः भोजन केले असता व्रताची पूर्तता व इष्ट मनोरथ पूर्ण.

# हनुमान चालीसा पठण करण्याची योग्य पद्धत काय?

## हनुमान चालीसा वाचावी की ऐकावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमान चालीसा ही १६ व्या शतकात महान संत तुलसीदास महाराजांनी लिहिली आहे. तुलसीदास महाराज हे हनुमानजींचे भक्त होते. हनुमानजींनी साक्षात तुलसीदास महाराजांना दर्शन दिले होते. पौराणिक कथेनुसार अकबराने तुलसीदास यांना पकडून कारागृहात बंदिस्त केले होते. त्यावेळी तुलसीदास महाराजांनी संकटमुक्तीसाठी ४० पंक्तींची हनुमान चालीसा रचली होती. या चालीसा मधील प्रत्येक ओळ ही महत्वपूर्ण आहे. हनुमानजींची महती यामध्ये लिहिली आहे. आरोग्य,भूतबाधा,नकारात्मकता व जीवनातील कोणत्याही समस्या हनुमानजी दूर करू शकतात हेच यामध्ये तुलसीदास महाराजांनी सांगितले आहे. मात्र हनुमान चालीसा पठण करताना काही नियम आहेत का याबद्दल जाणून घेऊया.

**हनुमान चालीसा पठण करण्याचे नियम**

- हनुमान चालीसा पठण करताना शुद्ध,पवित्र भावाने एकचित्त होऊन हनुमानजींचे चिंतन करून चालीसा पठण करावी.
- हनुमान चालीसा स्वच्छ जागी बसून वाचावी.
- हनुमान चालीसा पठण करताना स्वच्छ वस्त्र अंगावर असावेत.
- हनुमान चालीसा पठण करताना स्वच्छतेची सर्वात जास्त काळजी घ्यावी.
- हनुमान चालीसा वाचताना वेळेचे बंधन नाही. तुम्ही मनापासून कोणत्याही वेळेस हनुमान चालीसा वाचू शकता.
- एखाद्या मोठ्या संकटात तुम्ही सापडले असाल अशावेळी तुम्ही नियम बाजूला ठेवून हनुमानजींचे स्मरण करून हनुमान चालीसा वाचू किंवा मनात म्हणू शकता.

**हनुमान चालीसा वाचावी की मनात म्हणावी, ऐकावी?**

हनुमान चालीसा ही वाचावी की ऐकावी अथवा मनात म्हणावी का असे प्रश्न अनेकांना पडलेले असतात. तुलसीदास महाराजांनी हनुमान चालीसामध्ये स्पष्ट लिहिले आहे 'जो यह पढे हनुमान चालीसा' याचा अर्थ तुम्हाला हनुमान चालीसा पाठ जरी असली तरी ती वाचावी असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे नियमानुसार हनुमान चालीसा पाठ करायचा असल्यास तुम्ही ती वाचा. वाचणे शक्य नसल्यास हनुमान चालीसा ऐकली किंवा मनात म्हटली तरी चालते.

## ॥हनुमान चालीसा॥

**॥ दोहा ॥**
श्री गुरु चरण सरोज रज, निज मनु मुकुरु सुधारि।
वरनऊँ रघुवर विमल जसु, जो दायकु फल चारि॥
बुद्धिहीन तनु जानिके, सुमिरो पवन कुमार।
बल बुद्धि विद्या देहु मोहिं, हरहु कलेश विकार॥

**॥ चौपाई॥**
जय हनुमान ज्ञान गुन सागर। जय कपीस तिहुँ लोक उजागर॥
राम दूत अतुलित बल धामा। अंजनिपुत्र पवन सुत नामा॥
महावीर बिक्रम बजरंगी। कुमति निवार सुमिति के संगी॥
कंचन वरन विराज सुवेसा। कानन कुंडल कुंचित केसा॥४॥

हाथ बज्र औ ध्वजा विराजै। काँधे मूँज जनेऊ साजै॥
शंकर सुवन केसरीनंदन। तेज प्रताप महा जग बंदन॥
विद्यावान गुनी अति चातुर। राम काज करिबे को आतुर॥
प्रभु चरित्र सुनिबे को रसिया। राम लखन सीता मन बसिया॥८॥

सूक्ष्म रूप धरि सियहि दिखावा। बिकट रूप धरि लंक जरावा॥
भीम रूप धरि असुर सँहारे। रामचंन्द्र के काज सँवारे॥
लाय सजीवन लखन जियाये। श्री रघुबीर हरषि उर लाये॥
रघुपति कीन्ही बहुत बड़ाई। तुम मम प्रिय भरत सम भाई॥१२॥

सहस बदन तुम्हरो जस गावैं। अस कहि श्रीपति कंठ लगावैं॥
सनकादिक ब्रह्मादि मुनीसा। नारद सारद सहित अहीसा॥
जम कुबेर दिगपाल जहाँ ते। कबि कोबिद कहि सके कहाँ ते॥
तुम उपकार सुग्रीवहिं कीन्हा। राम मिलाय राज पद दीन्हा॥१६॥

तुम्हरो मंत्र विभीषन माना। लंकेश्वर भये सब जग जाना॥
जुग सहस्त्र जोजन पर भानू। लील्यो ताहि मधुर फल जानू॥
प्रभु मुद्रिका मेलि मुख माहीं। जलधि लाँघि गये अचरज नाहीं॥
दुगम काज जगत के जेते। सुगम अनुग्रह तुम्हरे तेते॥२०॥

राम दुआरे तुम रखवारे। होत न आज्ञा बिनु पैसारे॥
सब सुख लहैं तुम्हारी सरना। तुम रच्छक काहू को डर ना॥
आपन तेज सम्हारो आपै। तीनों लोक हाँक तें काँपै॥
भूत पिसाच निकट नहिं आवै। महावीर जब नाम सुनावैं॥२४॥

नासै रोग हरै सब पीरा। जपत निरंतर हनुमत बीरा॥
संकट तें हनुमान छुड़ावै। मन क्रम वचन ध्यान जो लावै॥
सब पर राम तपस्वीं राजा। तिन के काज सकल तुम साजा॥
और मनोरथ जो कोई लावै। सोइ अमित जीवन फल पावै॥२८॥

चारों जुग परताप तुम्हारा। है परसिद्ध जगत उजियारा॥
साधु संत के तुम रखबारे। असुर निकंदन राम दुलारे॥
अष्ट सिद्धि नौ निधि के दाता। अस बर दीन जानकी माता॥
राम रसायन तुम्हरे पासा। सदा रहो रघुपति के दासा॥३२॥

तुम्हरे भजन राम को पावै। जनम जनम के दुख बिसरावै॥
अंत काल रघुबर पुर जाई। जहाँ जन्म हरि भक्त कहाई॥
और देवता चित्त न धरई। हनुमत सेइ सर्ब सुख करई॥
संकट कटै मिटै सब पीरा। जो सुमिरैं हनुमत बलबीरा॥३६॥

जै जै जै हनुमान गोसाईं। कृपा करहु गुरू देव की नाईं॥
जो सत बार पाठ कर कोई। छूटहि बन्दि महासुख होई॥
जो यह पढै हनुमान चलीसा। होय सिद्धि साखी गौरीसा॥
तुलसीदास सदा हरि चेरा। कीजै नाथ ह्रदय महँ डेरा॥४०॥

**॥ दोहा॥**
पवनतनय संकट हरन, मंगल मूरति रुप।
राम लखन सीता सहित, ह्रदय बसहु सुर भूप॥

# हनुमानजींची असते 'या' ४ राशींवर विशेष कृपा!

## ग्रहदोष साडेसातीचा होत नाही त्रास, कायम राहते मारुतीरायांची कृपा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमानजींच्या अधीन सर्व ग्रह आहेत, असे मानले जाते. ज्योतिषशास्त्रात ग्रहांना अत्यंत महत्त्व आहे. ग्रहांचे आपल्या कुंडलीतील स्थान व कोणता ग्रह कोणत्या राशीत आहे यावरून आपल्या जीवनावर परिणाम होतो. खरेतर आपण सारे हनुमानजींची लेकरे आहोत. मात्र, मेष, वृश्चिक, मकर व कुंभ या राशींच्या व्यक्तींवर हनुमानजींची विशेष कृपा दिसून येते. ग्रहांची स्थिती उत्तम असेल तर सकारात्मक अनुभव येतात व ग्रहांची स्थिती कुंडलीत कमकुवत असल्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र ज्यांच्यावर हनुमानजींची कृपा असते त्यांना कोणत्याही ग्रहाची वाईट दृष्टी हानी पोहोचवत नाही. याचे कारण म्हणजे हनुमानजींना साक्षात शनी देवाचे वरदान आहे जो व्यक्ती हनुमानजींचा भक्त असेल त्यावर माझी कूदृष्टी पडणार नाही. त्यामुळे हनुमानजींची पूजा करणे महत्त्वाचे मानले जाते. मात्र हनुमानजींच्या काही आवडत्या राशी आहेत ज्यांच्यावर त्यांची कायम कृपा असते. पाहूया कोणत्या आहेत या भाग्यशाली राशी?

**मेष**

या राशीचा स्वामी मंगळ आहे. मंगळाचा संबंध हनुमानजींशी आहे. मेष राशीच्या लोकांना आर्थिक पाठबळ हनुमानजी देतात. यांना करिअर मध्ये खूप यश मिळते. मेष राशीचे लोक धाडसी आणि बुद्धिमान असतात. हनुमानजींची कृपा मेष राशीच्या लोकांवर नेहमीच राहते. हनुमानजी मेष राशीच्या लोकांच्या सर्व समस्या, पीडा कायम दूर करतात. तसेच यांना कधीही पैशांची चणचण भासत नाही. या राशीचे लोक खूप धाडसी असतात.

**वृश्चिक**

या राशीचा स्वामी देखील मंगळ आहे आणि यामुळेच वृश्चिक राशीचे लोक हनुमानजींना खूप प्रिय आहेत. वृश्चिक राशीच्या लोकांवर हनुमानजींची खास कृपा असते. त्यामुळे त्यांना जीवनात कधीही सुख-समृद्धीची कमतरता भासत नाही. हनुमानजींच्या आशीर्वादाने वृश्चिक राशीच्या लोकांना नोकरी व्यावसायात कायम यश मिळते. पैशांची आवक सदैव असते. आर्थिक अडचणींचा सामना यांना फारसा करावा लागत नाही.

**मकर**

या राशीच्या लोकांवर हनुमानजींची विशेष कृपा असते. कारण मकर राशी ही मंगळ ग्रहाची उच्च रास आहे. मकर राशीच्या लोकांनी हनुमानजींची भक्ती केली तर त्यांना आयुष्यात कोणीही यश, सुख-समृद्धी मिळविण्यापासून अडवू शकत नाही. साक्षात बजरंगबलीचा आशीर्वाद मिळाल्याने यांच्या शत्रूंचा देखील नाश होतो. कोणत्याही प्रकारच्या बाधा कामात येत नाहीत. प्रगतीचे मार्ग खुलतात. आयुष्यात समस्या आल्या तरी त्याचे निराकरण हनुमानजींच्या कृपेने होते.

**कुंभ**

या राशीचा स्वामी शनी देव आहेत. कुंभ राशीच्या लोकांनी जर नियमित हनुमानजींची पूजा केली तर त्यांना हनुमानजींसोबतच शनी देवांचीही कृपा प्राप्त होते. शनीची साथ मिळाल्याने जीवनात कष्ट व अडचणी फारशा येत नाहीत. आरोग्याच्या समस्या सुटतात. कुंभ राशीच्या लोकांवर हनुमानजी प्रसन्न असल्याने यांना शनीच्या साडेसातीचा त्रास होत नाही. कमी वयात या राशीचे लोक यश मिळवितात. आयुष्यात अडचणी आल्या तरी खंबीरपणे त्यांचा सामना करतात. हनुमानजींच्या कृपेने या राशींना आत्मविश्वास व निर्भीडता मिळालेली असते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)